**ठळक बातम्या**

- ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारताची बाजू जगभरात मांडण्यासाठी शिष्टमंडळं रवाना होण्यास सुरुवात

- छत्तीसगडमधे झालेल्या चकमकीत वीसपेक्षा जास्त माओवादी ठार, एक जवान शहीद

- महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागात पुढचे चार दिवस मुसळधार पावसाची शक्यता

**आणि**

- कन्नड लेखिका बानू मुश्ताक यांच्या ‘हार्ट लॅम्प’ या लघुकथासंग्रहाला प्रतिष्ठेचा बुकर पुरस्कार जाहीर

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरची माहिती सर्व देशांना देणं आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद जगासमोर आणण्यासाठी भारतानं आखलेल्या धोरणांतर्गत संयुक्त जनता दलाचे खासदार संजय झा यांच्या नेतृत्वाखालचं सर्वपक्षीय शिष्टमंडळ आज पाच देशांच्या दौऱ्यासाठी रवाना झालं. हे शिष्टमंडळ इंडोनेशिया, मलेशिया, कोरिया, जपान आणि सिंगापूरला भेट देईल. रवाना होण्यापूर्वी संजय झा यांनी वार्ताहरांशी संवाद साधला.

ते म्हणाले,

**होल्ड... बाईट- संजय झा (१९ सेकंद)**

शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वातखालचं शिष्टमंडळही आज रवाना होणार आहे. हे शिष्टमंडळ संयुक्त अरब अमिराती, काँगो, लायबेरिया आणि सिएरा लिओन या देशांना भेट देईल. या दौऱ्याबद्दल श्रीकांत शिंदे यांनी वार्ताहरांना माहिती दिली.

**होल्ड... बाईट- श्रीकांत शिंदे (२० सेकंद)**

या धोरणांतर्गत एकूण सात सर्वपक्षीय शिष्टमंडळं ५ जूनपर्यंत ३२ देशांना भेट देऊन भारताची भूमिका समजावून सांगणार आहेत.

**<><><><><>**

पंजाबमधल्या अमृतसर इथं एका पाकिस्तानी घुसखोराला सीमा सुरक्षा दलानं काल अटक केली. ही व्यक्ती आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून भारतीय सीमेच्या आत येण्याचा प्रयत्न करत होता, सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी त्याला थांबवलं आणि ताब्यात घेतलं. त्या व्यक्तीची झडती घेतली असता त्याच्याकडे ३३० पाकिस्तानी रुपये सापडले. सीमा सुरक्षा दलानं त्याला स्थानिक पोलिसांच्या ताब्यात दिलं आहे.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात आणि राज्यात विविध ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत.

**नागपूर शहर कॉँग्रेस आणि जिल्हा ग्रामीण कॉँग्रेसतर्फे** 'तिरंगा यात्रा' काढली होती. यावेळी माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आदरांजली वाहण्यात आली.

**लातूर जिल्ह्यातही** शिवसेनेतर्फे तिरंगा यात्रा काढण्यात आली. यावेळी जिल्ह्यात सीमेवर सेवा बजावत असलेल्या जवानांच्या कुटुंबियांचा तसंच सेवानिवृत्त जवानांचा सत्कार करण्यात आला.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या नारायणपूर, विजापूर आणि दंतेवाडा भागात सुरक्षादलांशी ५० तासांपेक्षा जास्त काळ चाललेल्या चकमकीत वीसपेक्षा जास्त माओवादी ठार झाले. यात काही कुख्यात माओवाद्यांचा समावेश असल्याची शक्यता आहे. यात एक जवान शहीद झाल्याची तर आणखी एक जवान जखमी

झाल्याची माहिती छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांनी दिली आहे. ही कारवाई जवळपास संपल्याचं आणि या भागात मोठी शोधमोहीम सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

अमृत भारत स्थानक योजने अंतर्गत १८ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातल्या १०३ पुनर्विकसित रेल्वे स्थानकांचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या करणार आहेत. या रेल्वेस्थानकांवर अद्ययावत प्रतीक्षालय, शौचालय आणि निवाऱ्याचा समावेश आहे. याशिवाय विविध सुविधा या रेल्वेस्थानकांवर देण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रादेशिक तसंच जागतिक घडामोडींबाबत काल जर्मनीचे नवनियुक्त चॅन्सलर फ्रेडरिक मर्झ यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली. जर्मनीसह भारत दहशतवादाविरुद्ध ठामपणे उभा राहील, भारत-जर्मनी दरम्यानच्या रणनीतीविषयक भागीदारीत आणखी भर घालण्यासाठी भारत वचनबद्ध राहील, असं आश्वासन मोदी यांनी यावेळी मर्झ यांना दिलं. प्रधानमंत्र्यांनी मर्झ यांना भारतभेटीवर येण्याचं निमंत्रणही दिलं आहे.

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या ३४व्या स्मृतिदिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी नवी दिल्लीतल्या वीरभूमी इथं जाऊन राजीव गांधींना श्रद्धांजली वाहिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मन की बात या कार्यक्रमाद्धारे येत्या रविवारी जनतेशी संवाद साधणार आहेत.

श्रोते या कार्यक्रमासाठी त्यांच्या सूचना १ ८ ० ० १ १ ७ ८ ० ० या टोल फ्री क्रमांकावर पाठवू शकतात. नरेंद्र मोदी ॲप आणि माय गव्ह ॲपद्वारेही आपल्या सूचना २३ मे पर्यंत पाठवता येतील.

<><><><><>

कर्नाटकच्या समुद्रकिनाऱ्यालगत तसंच घाट विभागात अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. आसाम, मेघालय, गोवा,कोकण आणि मध्य महाराष्ट्रातही मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. उत्तराखंड, पंजाब, हरियाणा, चंढीगढ, उत्तर प्रदेशात २६ मे पर्यंत मेघगर्जनेसह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे.

<><><><><>

मुंबई शहर, उपनगरासह कोकणात काल वादळी वाऱ्यांसह मुसळधार पाऊस पडला असून आणखी चार दिवस पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. पालघर, ठाणे, मुंबई जिल्ह्यांना आज आणि उद्यासाठी यलो तर रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी आज आणि उद्या ऑरेंज अलर्ट  हवामान विभागानं दिला आहे. मान्सूनच्या अनुकूल स्थितीमुळे वेळेपूर्वीच पावसाला सुरुवात झाली असून यंदा चांगला पाऊस होण्याचा अंदाज हवामान तज्ज्ञांनी वर्तवला आहे. महाराष्ट्राच्या विविध भागात गेल्या १५ दिवसांपासून बिगरमोसमी पाऊस होत आहे.

<><><><><>

कन्नड लेखिका, वकील आणि सामाजिक कार्यकर्त्या बानू मुश्ताक यांनी लिहिलेल्या आणि दीपा भस्थी यांनी इंग्लिशमध्ये भाषांतरित केलेल्या ‘हार्ट लॅम्प’ या लघुकथासंग्रहाला प्रतिष्ठेचा बुकर पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्कारावर नाव कोरणारा हा पहिलाच लघुकथासंग्रह आणि पहिलीच मूळ कन्नड साहित्यकृती

आहे. तसंच दीपा भस्थी या बुकर पुरस्कार मिळवणाऱ्या पहिल्याच भारतीय भाषांतरकार आहेत. दक्षिण भारतातल्या पुरुषसत्ताक व्यवस्थेचा सामना करणाऱ्या महिला आणि मुलींची व्यथा मांडणाऱ्या १२ कथा या संग्रहात आहेत.

**<><><><><>**

न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरी बेहिशोबी रोख मिळाल्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करायची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळली. या प्रकरणात अंतर्गत चौकशी समितीनं सादर केलेला अहवाल सरन्यायाधीशांनी राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांकडे पाठवला असून याचिकाकर्त्यांनी आधी त्यांच्याकडे जावं, अशी सूचना न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती उज्जल भुयन यांच्या पीठानं केली.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरबद्दल समाजमाध्यमावर कथितरीत्या आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी अशोका विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक अली खान महमूदाबाद यांना आज सर्वोच्च न्यायालयानं जामीन मंजूर केला. मात्र, या प्रकरणी सुरू असलेला तपास थांबवायला न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या पीठानं नकार दिला. तसंच त्यांनी केलेल्या पोस्टचा तपास करण्यासाठी २४ तासांच्या आत वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांचं विशेष तपास पथक स्थापन करायचे आदेशही न्यायालयानं दिले. हे अधिकारी हरियाणा किंवा दिल्लीतले नसावेत, तसंच एक अधिकारी महिला असावी, असंही न्यायालयानं सांगितलं.

**<><><><><>**

भारताची सुरक्षा आणि आर्थिक हिताच्या दृष्टीनं दहशतवादाचा सामना करणं आणि सागरी सुरक्षा चोख ठेवणं अतिशय गरजेचं आहे, असं संयुक्त राष्ट्रांमधले भारताचे स्थायी प्रतिनिधी पी. हरीश यांनी सुरक्षा परिषदेला सांगितलं. सागरी सुरक्षा या विषयावरच्या एका चर्चेत विचार मांडताना, विविध धोक्यांचा सामना

करण्यासाठी भारतानं आखलेल्या व्यापक सागरी धोरणांची माहिती हरीश यांनी दिली.

<><><><><>

सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या दौऱ्यादरम्यान विहीत राजशिष्टाचार काटेकोरपणे पाळले जावेत, अशा सूचना राज्य शासनानं जारी केल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती २००४ च्या महाराष्ट्र राज्य अतिथी नियमानुसार राज्य अतिथी असतात. त्यामुळं त्यांना राजशिष्टाचारविषयक सुविधा पुरवण्यात याव्यात, असं सूचनापत्रात म्हटलं आहे. या मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधित सर्व विभागांना देण्यात आले आहेत.

<><><><><>

भारत आणि पाकिस्तान यांच्या अटारी-वाघा संयुक्त तपासणी नाक्यांवरील बीटिंग रिट्रीट समारंभ आज संध्याकाळपासून सर्वसामान्यांसाठी खुला होणार आहे.

//<><><><><>//